**राज्यातील शासनमान्यताप्राप्त व कृषी विद्यापीठाशी संलग्न असलेल्या खाजगी अनुदानित महाविद्यालयातील आणि कृषी विद्यापीठांतर्गतचे घटक (शासकीय) महाविद्यालयातील व्यावसायिक शैक्षणिक अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी सामायिक प्रवेश परिक्षा (CET) आणि प्रवेश प्रक्रिया लागू करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक : संकिर्ण १५१७/प्र. क्र.२०(१)/७अे,**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २ फेब्रुवारी, २०१८.

संदर्भ :- १) या विभागाची शासन अधिसूचना क्रमांक संकिर्ण १५१७/प्र. क्र.२०/७अे, दि. १५.०१.२०१८.
२) महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषदेचे पत्र क्र.मकृप/शिक्षण-१/प्र.क्र.५६१६/२००/२०१८, दि.२३.०१.२०१८.

## शासन निर्णय

महाराष्ट्र विना अनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क विनियमन) अधिनियम, २०१५ (२०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.२८) अंतर्गत, बी.एस.सी.(ऑनर्स)(कृषी)/ बी.एस.सी.(ऑनर्स)(उद्यानविद्या)/ बी.एस.सी.(ऑनर्स) (वनविद्या)/ बी.टेक्. (कृषी अभियांत्रिकी)/ बी.टेक्. (अन्नतंत्रज्ञान) / बी.एस.सी.(ऑनर्स) (सामाजिक विज्ञान)/ बी.टेक्. (जैवतंत्रज्ञान) या अभ्यासक्रमांना या विभागाच्या संदर्भाधिन क्र.(१) येथील दि.१५.१.२०१८ च्या अधिसुचनेन्वये व्यावसायिक शैक्षणिक अभ्यासक्रम म्हणून घोषित व अधिसूचित करण्यात आले आहेत. राज्यातील कृषी विद्यापीठांकडून मान्यताप्राप्त व संलग्नता प्राप्त असलेल्या कायम विनाअनुदानित खाजगी महाविद्यालयांमधील उपरोक्त अभ्यासक्रमांसाठी सामायिक प्रवेश परिक्षा आणि प्रवेश प्रक्रिया याबाबतची कार्यवाही उक्त अधिनियमाच्या कलम २३ अन्वये तयार करण्यात आलेल्या नियमातील तरतूदीनुसार आयुक्त, सामायिक प्रवेश परिक्षा तथा सक्षम प्राधिकारी यांच्याकडून करण्यात येणार आहे. तथापि, राज्यातील शासनमान्यताप्राप्त व कृषी विद्यापीठाशी संलग्न असलेल्या खाजगी अनुदानित महाविद्यालयातील आणि कृषी विद्यापीठांतर्गतचे घटक (शासकीय) महाविद्यालयांमधील उक्त नमूद व्यावसायिक शैक्षणिक अभ्यासक्रमांसाठी सामायिक प्रवेश परिक्षा आणि प्रवेश प्रक्रिया याबाबत कोणती कार्यवाही अवलंबिण्यात यावी याबाबत स्पष्टता नसल्याने, ही सुस्पष्टता व एकवाक्यता आणण्याच्या दृष्टीने राज्यातील शासनमान्यताप्राप्त व कृषि विद्यापीठांशी संलग्न असलेल्या खाजगी अनुदानित महाविद्यालयातील आणि कृषी विद्यापीठांतर्गतचे घटक (शासकीय) महाविद्यालयातील संदर्भाधिन क्र.(१) येथील दि.१५.०१.२०१८ च्या अधिसूचनेन्वये घोषित व अधिसूचित करण्यात आलेल्या व्यावसायिक शैक्षणिक अभ्यासक्रमांसाठी सामायिक प्रवेश परिक्षा आणि प्रवेश प्रक्रिया उक्त अधिनियमाच्या कलम २३ अन्वये तयार करण्यात आलेल्या नियमातील तरतूदीनुसार आयुक्त, सामायिक प्रवेश परिक्षा तथा सक्षम प्राधिकारी यांच्या स्तरावरुन राबविण्यात यावी, असा शासनाने निर्णय घेतला आहे.

२. तरी सर्व संबंधितांनी अधिनियमातील तरतुदीनुसार आणि शासनाकडून वेळोवेळी देण्यात आलेल्या निदेशानुसार पुढील कार्यवाही करावी.

३. सदर शासननिर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.inया संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०२०२१५०११३७००१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Devappa
Annappa Gavade

Digitally signed by Devappa Annappa Gavade
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Agriculture And ADF Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=eb6891ac4984581cb912dab1f553c065a5dd35da6c8e7cf4f22d8f94fa5f56d7, serialNumber=d00367c67d2ea5a7aecea40a3081cba4d043b40cc7b0ef510250b3ea4f9795d6, cn=Devappa Annappa Gavade
Date: 2018.02.02 15:05:34 +05'30'

**(दे. आ. गावडे)**
सह सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. मा.राज्यपाल-नि-कुलपती यांचे सचिव, राजभवन, मुंबई
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा.मंत्री (कृषी) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४. मा.राज्यमंत्री (कृषी) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५. अपर मुख्य सचिव (कृषी), कृषी व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई
६. सचिव (पदुम), कृषी व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई
७. महासंचालक, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे,
८. आयुक्त, कृषी/ पशुसंवर्धन/मत्स्यव्यवसाय/दुग्धव्यवसाय, महाराष्ट्र राज्य, पुणे
९. महालेखापाल, महाराष्ट्र १ / २ (लेखापरिक्षा / लेखा व अनुज्ञेयता) मुंबई / नागपूर,
१०. आयुक्त,सामायिक प्रवेश परिक्षा(CET) तथा सक्षम प्राधिकारी, ३०५, गव्हर्नमेंट पॉलिटेक्निक बिल्डिंग, ४९, ,खेरवाडी, अलियावर जंग मार्ग, बांद्रा-पूर्व, मुंबई-५१.
११. कुलगुरु/ कुलसचिव, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी,
१२. कुलगुरु/ कुलसचिव, डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली,
१३. कुलगुरु/ कुलसचिव, डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला,
१४. कुलगुरु/ कुलसचिव, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी,
१५. सर्व सह सचिव/उप सचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई
१६. निवड नस्ती, कार्यासन ७-अे, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.